
# नागरी संरक्षण
# व
# वाहतूक सुरक्षा

## इयत्ता नववी





शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. २९.०६.२०२१ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# नागरी संरक्षण
# व
# वाहतूक सुरक्षा

## इयत्ता नववी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४.

Y6U1V8

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA App द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q.R.Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठासंबंधित अध्ययन-अध्यापनासाठी उपयुक्त दृक्-श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

**प्रथमावृत्ती : २०२१** © महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११००४

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्‌धृत करता येणार नाही.

**नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा अभ्यासगट (निमंत्रित)**

मा. सुनिल फुलारी, भा.पो.से

डॉ. ज्ञानेश्वर शेळके

डॉ. प्रसाद राजहंस

श्री. अरविंद देशमुख

श्री. उमेश देशमुख

श्री. रावसाहेब जाधव

श्रीमती अंजली चव्हाण

श्री. सोमनाथ बोंतले

श्री. किशोर राठोड

श्रीमती प्रतिभा हरीभक्त

श्री. संदीप घोलप

श्री. श्रीनिवास वाळवेकर

श्री. संजय भैलुमे

डॉ. अजयकुमार लोळगे (सदस्य सचिव)

**अक्षरजुळवणी**

पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**मुखपृष्ठ व अंतर्गत चित्राकृती**

श्रीमती प्रज्ञा काळे

श्री. उमेश देशमुख

श्री. विजय लोहार

श्री. बाळासाहेब कचरे

श्री. किशोर कुदळे

**निर्मिती**

श्री. सच्चिदानंद आफळे,
मुख्य निर्मिती अधिकारी

श्री. संदीप आजगावकर,
निर्मिती अधिकारी

**कागद**

७० जी.एस.एम.क्रीमवोव्ह

**मुद्रणादेश**

N/PB/2021-22/QTY.10000

**मुद्रक**

S.P. Binding Works, Pune

**प्रमुख संयोजक**

**डॉ. अजयकुमार लोळगे**

विशेषाधिकारी कार्यानुभव व
प्र. विशेषाधिकारी, कला शिक्षण,
प्र. विशेषाधिकारी, आरोग्य व शारीरिक शिक्षण,
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

**प्रकाशक**

**विवेक उत्तम गोसावी**

नियंत्रक,
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई - २५

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

**विद्यार्थी मित्रांनो,**

इयत्ता नववीच्या वर्गात तुम्हा सर्वांचे स्वागत आहे. 'नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा' या विषयाचे पाठ्यपुस्तक तुमच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

सध्याचे २१ वे शतक जागतिकीकरणाचे, विज्ञानाने उद्योग व्यवसायात उत्तुंग यश संपादन केलेले गतिमान युग आहे. या युगात रस्त्यावरील वाहनांची संख्या अमर्याद वाढली आहे. रस्ते आहेत तेवढेच आहेत. परिणामी रस्त्यावर होणाऱ्या अपघातांचे प्रमाण वाढत आहे. रस्त्यावरील अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीमध्ये 'सुरक्षित वाहतूक व सुरक्षित नागरी जीवन' आत्मसात करण्यासाठी व अपघातमुक्त राष्ट्राच्या वाटचालीसाठी या विषयातून तुम्हाला मार्गदर्शन मिळेल.

तुम्हांला माहीत आहेच की, वाहतूक सुरक्षेबरोबरच नागरी संरक्षण या विषयाचेही अनन्यसाधारण महत्त्व आहे. या पाठ्यपुस्तकाचा मूळ हेतू नागरी सुरक्षा, अपघातमुक्त जीवन, देशप्रेम, स्वयंशिस्त, राष्ट्रहित यांसारख्या मूल्यांची जोपासना करणे असा आहे. चर्चा, वाहतूक नियंत्रण कक्षाच्या भेटी, पदकवायत (परेड), मुलाखत, अपघातग्रस्तांना प्रत्यक्ष मदत करणे अशा कृतींतून हा विषय तुम्ही अभ्यासणार आहात. पुस्तिकेत दिलेल्या कृती, उपक्रम तुम्ही आवर्जून करा. आवश्यक तेथे तुमच्या शिक्षकांची, पालकांची, वाहतूक पोलीस दलाची, प्रथमोपचार पथकाची, वर्गातील इतर सहकाऱ्यांची मदत घ्या.

आजच्या तंत्रज्ञानाच्या गतिमान युगात संगणक, स्मार्टफोन, वाहनातील जी.पी.एस (ग्लोबल पोझिशनिंग सिस्टीम/स्थाननिश्चिती प्रणाली) हे तुमच्या परिचयाचे आहेतच. या पाठ्यपुस्तकाचा अभ्यास करताना माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाच्या साधनांचा सुयोग्य वापर करा. जेणे करून तुमचे अध्ययन सुकर होईल. हे पाठ्यपुस्तक वाचताना, अभ्यासताना आणि समजून घेताना तुम्हाला त्यातील आवडलेला भाग तसेच अभ्यास करताना येणाऱ्या अडचणी, पडणारे प्रश्न आम्हाला जरूर कळवा.

तुमच्या शैक्षणिक प्रगतीसाठी व सुरक्षित जीवनासाठी हार्दिक शुभेच्छा.

(दिनकर पाटील)
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : १४ मे २०२१
भारतीय सौर : २ फाल्गुन १९४१

## शिक्षकांसाठी

**मित्रहो,**

'नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा' हा विषय शिकवण्याची अत्यंत महत्त्वपूर्ण, आव्हानात्मक, तितकीच समाजहिताची जबाबदारी आपल्याकडे सुपुर्द करण्यात आली आहे. त्याबद्दल प्रथम आपले अभिनंदन! या विषयाचे महत्त्व, वेगळेपण तसेच यातून काय साध्य होणे अपेक्षित आहे हे स्पष्ट झाल्यास शिक्षणप्रक्रियेची परिणामकारता वाढेल व विद्यार्थ्यांवर तुम्ही घेत असलेल्या मेहनतीस नक्की यश लाभेल असा आत्मविश्वास आम्हाला वाटतो.

**विषयाची गरज :**

(१) इयत्ता नववी व दहावी हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण काळ असतो. याच काळात विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक, मानसिक बदल झपाट्याने घडत असतात. त्या सर्व बदलांचा प्रभाव त्यांच्या अभ्यासावर, पालकांशी, शिक्षकांशी असणाऱ्या संबंधांवर, त्यांनी घेतलेल्या निर्णयांवर पडत असतो. या बदलांचे स्वरूप व त्यांना यशस्वीपणे हाताळण्याचे मार्ग जर विद्यार्थ्यांनी समजून घेतले तर त्यामुळे होणारे अनिष्ट परिणाम टाळता येतील.

(२) रस्त्यावरील सुरक्षेचे नियम हा शालेय अभ्यासक्रमातील एक भाग असावा. जर मुलांना सुरुवातीपासूनच वाहतूक सुरक्षितता व नागरी संरक्षण यांविषयी शिकवले, तर ते रस्त्यावर वावरताना शिस्तबद्ध नागरिक बनतील. रस्त्याचा वापर, वाहतूक सुरक्षेविषयीचे नियम यांच्याविषयी 'जागृती मोहीम' हा रस्त्यावरील अपघातांवर नियंत्रण ठेवण्याच्या उपायांपैकी एक उपाय आहे. या पुस्तकाचा अभ्यास हा या उपक्रमाचा एक भाग आहे.

(३) रस्त्याचा संबंध नेहमी समाजाच्या विकासाशी जोडला जातो. एखादे गाव, एखादे ठिकाण रस्त्याने जोडले जाते तेव्हा त्या भागाचा आर्थिक विकास होतो, पण त्याबरोबरच माणसांची गर्दी वाढते. वाहनांची संख्या अमर्याद वाढते. म्हणजेच रस्त्याचा वापर करणाऱ्यांची संख्या वाढते. यातूनच रस्त्यावरील अपघातांचे प्रमाण वाढते. यामुळे लाखो कुटुंबांची हानी होत आहेत. कुटुंबातील एक कर्ती व्यक्ती अपघातात मृत्युमुखी पडल्यानंतर त्या संपूर्ण कुटुंबाची वाताहात होते. हे सर्व टाळण्यासाठी बालवयापासूनच वाहतुकीचे नियम शिकवले पाहिजेत. त्यांना रस्त्यावरील चिन्हांचे ज्ञान व्हावे, वाहनाच्या अतिवेगाचे दुष्परिणाम समजावेत या दृष्टीने प्रयत्न होणे गरजेचे आहे व ते प्रयत्न आपण या पाठ्यपुस्तकाच्या माध्यमातून करणार आहोत. त्यामुळे आपले विद्यार्थी 'ट्रॅफिक सेन्सयुक्त' बनतील व 'अपघातमुक्त' महाराष्ट्रासाठी मोलाचे योगदान देतील.

(४) अपघातात सापडलेल्या व्यक्तीला प्रथमोपचार करून दवाखान्यात पोहोचवणे, नैसर्गिक आपत्ती, मानवनिर्मित आपत्ती यांमुळे ओढवणाऱ्या संकटात सापडलेल्या व्यक्तींना मदत करणे अशा वृत्ती या पुस्तकाच्या अभ्यासाने विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होतील.

(५) नागरी संरक्षण संघटनेचे कार्य या पाठ्यपुस्तकाच्या अभ्यासातून सर्वांपर्यंत पोहोचेल. जेणेकरून आपत्तीच्या वेळी होणारी मनुष्यहानी, वित्तहानी कमी करण्यास सहकार्य होईल.

**अध्ययन व अध्यापन :**

(१) यामध्ये पाठ्य घटकाची माहिती थोडक्यात दिली असली तरी विद्यार्थ्यांना चौकातील प्रत्यक्ष वाहतूक नियंत्रण करण्यास न्यावे, त्यांच्याकडून अपघाताच्या ठिकाणी, संकटाच्या वेळी मदत करण्याचे प्रात्यक्षिक करून घ्यावे. अपघातग्रस्तांना स्ट्रेचरवरून नेणे-आणणे, प्रथमोपचार इत्यादींविषयी जास्तीतजास्त प्रात्यक्षिके करून घ्यावीत. क्षेत्रभेटी, चर्चा, संवाद यांतून विद्यार्थ्यांवर चांगला प्रभाव पडेल.

(२) प्रार्थनेच्या वेळी वृत्तपत्रांतील अपघातांच्या बातम्यांचे वाचन करण्यास सांगावे. म्हणजे अपघात, मृत्यू, जखमी हा विषय किती जटिल बनला आहे हे त्यांना समजून येईल.

**अभ्यासगट (निमंत्रित)**

**नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा**
**पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.**

## विद्यार्थ्यांसाठी

### रस्त्यावरील सुरक्षेचे दहा नियम

- **थांबा किंवा वेग नियंत्रित करा–** झेब्रा क्रॉसिंगवर प्रथम पादचाऱ्यांना रस्ता पार करू द्यावा. त्यांना रस्त्यावर चालण्याचा अधिकार आहे (नियम 11)[1]
- **पट्टा बांधणे–** जेणेकरून आपले कुटुंब आणि आपण गाडीमध्ये सुरक्षित असाल. सीटबेल्टमुळे टक्करीचा आघात 80% ने कमी होतो. (नियम 138)[3]
- रस्त्यावरील अपघात टाळण्यासाठी वाहतुकीचे नियम आणि चिन्हे यांचे पालन करा. (नियम 119)[3]
- आपल्या स्वत:च्या आणि इतरांच्या सुरक्षेसाठी वेगाच्या मर्यादेचे पालन करा. निवासी भागात आणि बाजारच्या ठिकाणी, आदर्श गती ही 20 कि.मी./तास आहे आणि मर्यादा 30 कि.मी. / तास आहे. (नियम 112)[3]
- रस्त्यावर यंत्रातील बिघाड आणि अपघात टाळण्यासाठी वाहन सुस्थितीत ठेवा. (नियम 190)[3]
- लक्ष विचलित करणाऱ्या मोबाईलचा कधीही ड्रायव्हिंग करताना वापर करू नका. (नियम 184)[2]
- दुचाकीवरून जाताना आपल्या डोक्याचे संरक्षण करण्यासाठी हेल्मेटचा वापर करा. (नियम 129)[3] एक दर्जेदार हेल्मेट डोक्याला होणाऱ्या गंभीर इजेच्या शक्यतेस 70% पेक्षा अधिक ने कमी करते.
- आपल्या स्वत:ची आणि रस्त्याच्या इतर वापरकर्त्यांची सुरक्षा निश्चित करण्यासाठी कधीही धोकादायक रीतीने गाडी चालवू नका.

  (नियम 184)[3]
- नम्रतेची वर्तणूक करा : सर्वांशी रस्ता शेअर करा आणि कनवाळूपणाने वागा. कधीही रस्त्यांवरील क्रोधा (रोडरेज)च्या आहारी जाऊ नका.
- कधीही दारू पिऊन गाडी चालवू नका. जबाबदारीने वागा.

  (नियम 185)[3]



१. रस्त्याच्या कायद्याचे नियम, 1989

२. केंद्रीय मोटार नियम, 1989

३. मोटार वाहन कायदा, 1988

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | नागरी संरक्षण | ०१ |
| २. | नागरी संरक्षण संघटना | ०६ |
| ३. | वाहतूक नियंत्रणाचे इशारे | १२ |
| ४. | वाहतुकीचे नियम | २९ |
| ५. | वाहनांचे प्रकार व राज्यांचे संकेत | ३७ |
| ६. | अग्निशमन | ४५ |
| ७. | आपत्ती व त्याचे प्रकार | ५० |
| ८. | पदकवायत | ६० |
| ९. | प्रथमोपचार | ६९ |


## भारताचे संविधान

भाग 4 क

# नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद 51 क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वजाचा व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्च पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.